**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत प्राथमिक शाळा व अंगणवाड्यांना पाणी पुरवठा उपाययोजना घेण्यासाठी खर्चाची मर्यादा निश्चित करण्याबाबत**

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-११११/प्र.क्र.११६/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक: ८ फेब्रूवारी, २०१२**

**वाचा:** १) शासन परिपत्रक, पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-११०८/प्र.क्र.३२/पापु-०७, दि.२२ मे,२००८
२) शासन परिपत्रक, पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-११११/प्र.क्र.१०/पापु-०७, दि. १६ मार्च, २०११
३) संचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे पत्र क्र.आवेधन /कक्ष-२/विविका/पं.क्र.१२ /२०/२०१२,दि.१०/१/२०१२

**प्रस्तावना:**

संदर्भ क्र. १ येथील शासन परिपत्रकान्वये, भारत निर्माण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या होत्या. या सूचनांमधील मुद्दा क्र.०९ अन्वये, राज्यातील शाळा अंगणवाड्यं ामधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न शीघ्र गतीने सोडविण्यासाठी सदर कामासाठी असलेली रु.३०,०००/- पर्यंतच्या खर्चाची मर्यादा रु.६०,०००/- पर्यंत वाढविण्यात आली होती. मात्र, या शासन परिपत्रकातील सूचना ह्या केवळ मार्च,२००९ पर्यत लागू असल्याने, सद्यस्थितीत नियमित मर्यादेत शाळा व अंगणवाड्यं ामध्ये पिण्याच्या पाण्याच्या सुविधा घेण्यामध्ये अडचणी येत असल्याची बाब क्षेत्रीय कार्यालयांकडून शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली होती. त्यामुळे संदर्भ क्र. २ येथील शासन परिपत्रकान्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत, शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनांसाठी करावयाच्य खर्चाची मर्यादा अपवादात्मक परिस्थितीत रू. ६०,०००/- पर्यंत वाढविण्यास परवानगी देण्यात येऊन त्यास दि. ३१ मार्च, २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र या रु.६०,०००/- च्या वाढीव खर्चाच्या मर्यादेत देखील विंधण विहिरी व कुप नलिकांचे कामे होऊ शकत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली आहे.तसेच संबंधित गावे /वाड्यामधील अस्तित्वातील अथवा प्रस्तावित पाणी पुरवठा योजनांमधून शाळा व अंगणवड्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करणे शक्य आहे किंवा कसे याची शहानिशा न करताच शाळा व अंगणवड्यांमध्ये विंधन विहिरी अथवा कुपनलिका यासारख्या खर्चिक उपाययोजना प्रस्तावित केल्या जातात असेही शासनाच्या निदर्शनास आले आहे.

याबाबत संचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये शासनास केलेल्या शिफारशी विचारात घेऊन यासंदर्भात सुधारित सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

D:\Khadse\CR 116 11 circular1.doc

**शासन परिपत्रक :**

प्रस्तावनेतील माहिती विचारात घेऊन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत, ग्रामीण भागामध्ये शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनांसाठी खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत-

१) शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना घेताना प्रथम संबंधित गावे / वाड्यांमध्ये नियमित पाणी पुरवठा योजना कार्यरत असल्यास अशा कार्यरत योजनेतून पाईपलाईन टाकुन शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) गावे / वाड्यांमधील अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेतून शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून देणे शक्य नसल्यास अथवा संबंधित गावे /वाड्यामध्ये कोणतीही अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना नसल्यास तसा अहवाल कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद यांनी अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष यांना सादर करावा. अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष यांनी प्रकरण निहाय तपासणी करुन शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विंधन विहिरी अथवा कुपनलिका घेण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांच्याकडे करावी. अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष यांनी शिफारस केल्यानंतरच मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांनी प्रस्तावांना मान्यता द्यावी.

३) नागपूर विभागातील रुपांतरित खडकाच्या आणि कोकण विभागातील जांभा खडकाच्या भूस्तरात घ्यावयाच्या विंधन विहिरींसाठी ३० ते ४० मिटर खोलीसाठी लोखंडी केसिंग पाईप ऐवजी युपीव्हीसी /पीव्हीसी केसिंग पाईपचा वापर करण्यात यावा.त्यासाठी विंधन विहिरींच्या खर्चाची मर्यादा रु.५५,३००/- इतकी निश्चित करण्यात येत आहे.

४) नागपूर विभागातील रुपांतरित खडकाचा आणि कोकण विभागातील जांभा खडकांच्या भूस्तराचा प्रदेश वगळता उर्वरित बसाल्ट भूस्तरातील विंधण विहिरींच्या खर्चाची कमाल मर्यादा रु.३८,९०४/- इतकी निश्चित करण्यात येत आहे.

५) वालूकामय (Sedimentary) प्रदेशातील ग्रामिण भागातील शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनांतर्गत कुपनलिकांच्या खर्चाची मर्यादा रु. १,६५,०००/- इतका निश्चित करण्यात येत आहे.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा ही अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेमधून करुन देण्याबाबत कार्यवाही करावी.परंतू ते शक्य नसल्याची खातरजमा केल्यानंतरच विंधन विहिर व कुप नलिका घेण्याबाबत कार्यवाही करावी.

७) या परिपत्रकातील सुचना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम चालू असे पर्यंत अस्तित्वात राहतील.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०२०८०६२५३८२३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र.अं.खडसे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
सर्व विधानसभा /विधान परिषद सदस्य
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
**सर्व** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
**सर्व** जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
**सर्व** अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
**सर्व** कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
**सर्व** प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
**सर्व** प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
**सर्व** जिल्हा वरिष्ट भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७